पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८ लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/७५०/२०१८
दि. ६ /०७/२०१८ ७०१८

**विषय** :- वेतन आयोगातील वेतनश्रेणी वाढ संदर्भात
अर्ज/प्रस्तावांबाबत.

परिपत्रक

माझे असे निदर्शनास आले आहे की, विविध पदांचे वेतन आयोगातील वेतन श्रेणी वाढ करण्या संदर्भात काही कर्मचारी थेट मा.आयुक्त/ लेखा विभागाकडे अर्ज करतात हे कार्यालयीन शिस्तीस धरून नाही.

सबब, या परिपत्रकाद्वारे सर्व संबधितांना कळविण्यात येते की, वेतनश्रेणी वाढ संदर्भातील प्रस्ताव / अर्ज परस्पर मा.आयुक्त अथवा लेखा विभागाकडे न करता संबधित विभागप्रमुख यांचे मार्फत मा.आयुक्त/ लेखा विभागाकडे सादर करण्यात यावेत. विभागप्रमुख / शाखाप्रमुख यांनी सदर अर्जातील मागणी कायदेशीर दृष्ट्या योग्य आहे किंवा कसे? याबाबत संबधित कायदे, नियम, तरतुदी शासननिर्णय इत्यादींचा अभ्यास करून योग्य असेल तरच स्पष्ट शिफारशी सह अर्ज/प्रस्ताव लेखा विभागाकडे पाठविण्यात यावेत. केवळ अर्ज आला म्हणून पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येवू नये. सबब, विभागप्रमुखांचे स्वयंस्पष्ट शिफारशी व्यतिरिक्त थेट आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

**प्रति,**
सर्व विभागप्रमुख/शाखाप्रमुख